# जिल्हा वार्षिक योजना २०१५-१६ अंतर्गत कृषि चिकीत्सालयाची स्थापना व बळकटीकरण योजनेच्या मार्गदर्शक सुचना

**१.प्रस्तावना-**

विकसीत कृषि तंत्रज्ञानाचा प्रचार व प्रसार शेतक-यापर्यंत प्रभावीपणे व जलदगतीने होऊन त्याव्दारे शेतक-यांना त्या त्या भागातील प्रमुख पिकांचे उत्पादन व उत्पादकता वाढविण्याकरीता प्रोत्साहन देऊन सहाय्य करणे, शेतक-यांना नवीन तंत्रज्ञान पुरविण्याकरीता प्रशिक्षण कार्यक्रम आयोजित करणे, माती व पाणी यांची तपासणी करणे, पिकांवर येणा-या किडी व रोग यांचे निदान करणे या सर्व सुविधा एकाच ठिकाणी उपलब्ध करुन देण्याकरीता सन १९९७-९८ पासून राज्यातील सर्व तालुक्यांमध्ये टप्याटप्याने कृषि विभागाच्या प्रक्षेत्रावर कृषि चिकित्सालयाने स्थापन करण्याचा निर्णय घेण्यात आला असून २००५-०६ पर्यंत २३१ ठिकाणी कृषि चिकित्सालय स्थापन करण्यात आलेली आहेत.

राज्यात स्थापित झालेली कृषि चिकित्सालये कार्यक्षम करण्यासाठी त्या कृषि चिकित्सालयांवर उपलब्ध असलेल्या इमारतीचे विस्तारीकरण करणे, आवश्यक दुरुस्ती करणे, जिल्हा पातळीवरील प्रशिक्षण केंद्रावर साधन सामुग्री/यंत्र सामुग्रीची, वास्तुची देखभाल, दुरुस्ती, प्रशिक्षण हॉल व प्रशिक्षणासाठी आवश्यक साहित्यांचा पुरवठा करणे आणि कृषि चिकित्सालयाचा महत्वाचा उद्देश म्हणजे शेतक-यांना आवश्यक सल्ला व सेवा पुरविणे याकरीता लागणारी यंत्रसामुग्री इ. सुविधा करणे.

**२.योजनेचा उद्देश-**

कृषि चिकित्सालय अंतर्गत मुख्यत: तीन प्रकारचे विस्तार कार्य हाती घेण्यात येत आहे.

१ शेतक-यांचे प्रशिक्षण

२ प्रात्यक्षिके

३ कृषि सेवा देणे

**३.आर्थिक तरतूद-**

सदरची योजना १०० टक्के राज्य पुरस्कृत आहे.

**४.भौतिक उद्दिष्ट-**

शासनाचे प्रचलित नियम व अटीनुसार खर्च करण्यात यावा. खर्च करण्यासाठी विहीत कार्यपध्दतीचा तंतोतंत अवलंब करावा. मंजुर निधीचा विनियोग राज्यातील स्थापित कृषि चिकित्सालयांना अधिक कार्यक्षम करण्यासाठी खालील बाबींबर करण्यात यावा.

**४.१.गौण बांधकामे-**

गौण बांधकामे या बाबीखाली कृषि चिकित्सालयावरील बांधकामाचे विस्तारीकरण, संग्रहालय, ग्रंथालय, शेडींग नेट, प्रशिक्षण हॉल इ.कामे प्राधान्याने घेण्यात यावीत. जिल्हा प्रशिक्षण केंद्रावरील शेतकरी निवास, शून्य उर्जा शीतगृह, प्रयोगशाळा इमारत, कार्यालय/कर्मचारी निवास, अंतर्गत रस्ते इ.चा विस्तारीकरणात समावेश करण्यात यावा. सदर बांधकामे घेतांना जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी यांची अंदाजपत्रक व सविस्तर आराखड्यास पुर्वमान्यता घ्यावी. जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी यांनी सविस्तर आराखडा व अंदाजपत्रकांना तपासुन पुर्वमंजुरी द्यावी. तसेच अनाठायी खर्च होत नसुन विकासाच्या दृष्टीने आवश्यक बाबींवर खर्च होत आहे याची खात्री करावी. इमारत दुरुस्ती देखभाल करणे, ती सुस्थितीत ठेवणे याकरीता आवश्यक असणारा खर्च, त्याचप्रमाणे यंत्रसामुग्री व प्रयोगशाळेतील उपकरणाची देखभाल व दुरुस्ती करुन ती सुस्थितीत ठेवणे याकरीता लागणारा खर्च या घटकांतर्गत करण्यात यावा.

**४.२.यंत्रसामुग्री व साधनसामुग्री-**

या बाबीखाली दृकश्रवण साहित्य, प्रयोगशाळा उपकरणे, ठिबक/तुषार सिंचन, रेनगन, सुधारीत कृषि अवजारे, (कृषि विद्यापीठांनी शिफारस केलेली) पीक संरक्षक उपकरणे इ. समाविष्ट करण्यात येत आहे.

कृषि चिकित्सालयावर खरेदी करावयाच्या दृकश्रवण साहित्य व प्रयोगशाळा उपकरणे, ठिबक/तुषार सिंचन उपकरणे, पॉवर टिलर, सुधारीत अवजारे, सौर उर्जा उपकरणे, बीज प्रक्रिया सयंत्र, पीक संरक्षक उपकरणे इनव्हर्टर, बॅटरी व युपीएस व इतर मशागतीकरीता व यांत्रिकीकरणासाठी उपलब्ध सुधारीत अवजारे व इ.वर खर्च करता येईल. त्याचप्रमाणे सदरचा खर्च कृषि चिकित्सालयावर आयोजित करावयाची प्रात्यक्षिके, प्रशिक्षण व सल्ला/सेवा या बाबीसाठी आवश्यक यंत्रसामुग्री, उपकरणे व सामुग्रीकरीता करावयाचा आहे.

**४.३.सामुग्री व पुरवठा-**

कृषि चिकित्सालयावर प्रात्यक्षिके, प्रशिक्षण व सेवा उपलब्ध करण्यास आवश्यक बियाणे, खते, युरिया डीएपी ब्रिकेट्स, पीक संरक्षक औषधे तसेच इतर उपक्रमांसाठी आवश्यक साधन सामुग्री व तदनुषंगीक साहित्य इ.बाबीवरच खर्च करण्यात यावा. सदर तरतूदीचा वापर प्रक्षेत्रावरील इतर कामाकरीता खर्च करण्यात येऊ नये.. निधीच्या अपव्यय झाल्याचे आढळून आल्यास संबंधिताविरुध्द कडक कारवाई करण्यात येईल. हा खर्च करतांना जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी यांची पुर्वमान्यता घ्यावी.

**५.कृषि चिकित्सालयावर राबविण्यात येणारे उपक्रम-**

**५.१. शेतकरी प्रशिक्षण**

सदर प्रशिक्षण केंद्रावर संबंधित योजनेप्रमाणे एक किंवा दोन दिवसाचे प्रशिक्षण वर्गाचे आयोजन करावे. शेतकरी प्रशिक्षणाबाबतचे वेळापत्रक संबंधित उपविभागीय व तालुका कृषि अधिकारी यांनी हंगामापुर्वीच तयार करुन त्याप्रमाणे शेतकरी/कर्मचारी प्रशिक्षणाचे आयोजन करावे. प्रशिक्षण कार्यक्रम तयार करतांना विविध योजना अंतर्गत शेतक-यांना मिळणारे फायदे तसेच त्यांच्या भागात येणा-या पिकांविषयी प्रशिक्षण कार्यक्रम तयार करावा.

प्रशिक्षणाला येणा-या प्रशिक्षणार्थी शेतक-यांची प्रक्षेत्रावरील प्रात्यक्षिकांना भेट आयोजित करुन त्यांचे कृषि तंत्रज्ञान विषयक समस्यांचे निराकरण करावे. तसेच त्यांना अद्ययावत कृषि तंत्रज्ञान व उपलब्ध सेवाचा लाभ देण्यात यावा. तालुका कृषि अधिकारी यांनी शेतक-यांच्या भेटीचा वर्षाचा कार्यक्रम (महिना निहाय) तयार करावा.

कृषि विभागाच्या विविध योजनांमधून शेतकरी प्रशिक्षण या घटकाखाली असलेल्या अनुदानातून कृषि चिकित्सालयावर प्रशिक्षण या घटकाखाली असलेल्या अनुदानातून कृषि चिकित्सालयावर प्रशिक्षण कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येते. प्रशिक्षण कार्यक्रम यशस्वीरित्या पार पाडण्याची जबाबदारी ही उपविभागीय कृषि अधिकारी आणि कृषि अधिकारी यांची असुन त्याबाबत त्यांना संबंधित कृषि चिकित्सालयांवरील सोईसुविधा आणि इतर व्यवस्थापन याबाबत त्या त्या कृषि अधिकारी यांना मार्गदर्शन करावे.

**५.२. प्रात्याक्षिके**

कृषि चिकित्सालये ही तालुका बिजगुणन केंद्र, अन्विक्षा-नि-प्रात्यक्षिक केंद्र, तालुका फळरोपवाटिका येथील कृषि विभागाच्या प्रक्षेत्रावर स्थापन करण्यात आलेली आहेत. या उपलब्ध प्रक्षेत्राचा कृषि उत्पादन वाढीचे दृष्टीने उपयुक्त ठरणा-या तंत्रज्ञानाची विविध प्रात्यक्षिके घेणेसाठी करावयाचा आहे. विविध केंद्र व राज्य पुरस्कृत योजनेंतर्गत प्रात्यक्षिकांसाठी अनुदान उपलब्ध आहे. या अनुदानाचा वापर करुन प्रत्येक कृषि चिकित्सालयाचे ठिकाणी त्या त्या भागातील पिके विचारात घेऊन सुधारीत तंत्रज्ञानाबाबतची प्रात्यक्षिके आयोजित करण्यात यावीत. जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी यांनी जिल्ह्यातील शेतक-यांची गरज, त्या भागातील प्रमुख पीके, त्या भागात प्रसारीत करावयाचे आधुनिक तंत्रज्ञान, त्या भागात नव्याने

अवलंबावयाचे तंत्रज्ञान इ.चा विचार करुन प्रत्येक हंगामात घ्यावयाचा प्रात्यक्षिक कार्यक्रम हंगामापुर्वीच तयार करावा. ही प्रात्यक्षिके आयोजित करणेची प्रमुख जबाबदारी संबंधित तालुका कृषि अधिकारी व त्या त्या प्रक्षेत्रावरील कृषि अधिकारी/कृषि पर्यवेक्षक यांची राहील.

**५.३. पीक संग्रहालय**

खरीप व रब्बी/उन्हाळी हंगामासाठी त्या त्या भागातील पिकांच्या विविध जाती, विविध लागवडीच्या पध्दती, आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर, त्या भागासाठी उपयुक्त ठरु शकणारी नवीन पिके व त्यांच्या विविध जाती, चारा पिके, औषधी वनस्पती इ.चे प्रभावी प्रसारणासाठी पीक संग्रहालय तयार करण्यात यावे. या क्षेत्रात प्रतिवर्षी खरीप व रब्बी/उन्हाळी हंगामातील उभ्या पिकांचे संग्रहालय असावे. प्रत्येक अधिसुचित वाणांची दोन ओळीत पेरणी करावी. प्रत्येक पीक संग्रहालयाच्या ठिकाणी फलक लावून त्यावर वाणांची नावे, पेरणी तारीख, खते, पीक संरक्षण इ.ची माहिती नमूद करावी.

**५.४. कृषि सेवा**

कृषि बहुविध चिकित्सालय स्थापन करीत असताना शेतकरी प्रशिक्षण, प्रात्यक्षिके व मेळावे या व्यतिरीक्त या केंद्रामार्फत शेतक-यांना अल्प प्रमाणात तांत्रिक सेवा उपलब्ध करुन देण्याचा महत्त्वाचा कार्यक्रम हाती घेण्यात यावा. यामध्ये प्रामुख्याने खालील बाबींचा समावेश राहील-

१. गांडूळ शेतीला प्रोत्साहन देण्यासाठी गांडूळ कल्चर, खत उत्पादन व विक्री, एस-९ कल्चर, नीलहरीत शेवाळ उत्पादन व विक्री, नाडेप संखाद उत्पादन याबाबत मार्गदर्शन करावे.
२. पिकांचे रोग व किडीची ओळख व निदान, उपाययोजना बाबत प्रत्यक्ष नमुन्यांची तपासणी करुन मार्गदर्शन करावे.
३. उपलब्ध सोईसुविधाचा वापर करुन मृद व पाण्याचे पृथःकरण करुन देऊन शेतजमीन व पाणी वापराबाबत मार्गदर्शन करणे, आवश्यक वाटल्यास मृद नमुना, सखोल मृद तपासणीसाठी प्रयोगशाळेत पाठविण्यात यावा.
४. वाचनालयाची सुविधा उपलब्ध करुन देणे.
५. संग्रहालयासाठी नवीन तंत्रज्ञानावर आधारीत मॉडेल्स व सुधारीत कृषि अवजारे ठेवून त्याविषयी मार्गदर्शन करावे.
६. एकात्मिक कीड/रोग व्यवस्थापन तंत्रज्ञानांतर्गत आवश्यक साधनांचे उत्पादन केंद्र स्थापन करुन गरजु शेतक-यांना त्यांचे उत्पादन व वापर करण्याचे प्रशिक्षण द्यावे.
७. उच्च तंत्रज्ञानाची माहिती उपलब्ध करुन देणे, जसे हरीतगृह, शीतगृह इ.चे उपयुक्ततेबाबत यथोचित मार्गदर्शन करावे.

कृषि चिकित्सालयावर उपरोक्त विविध उपक्रम राबविणेसाठी लागणा-या मजूरीच्या रकमेचा अंतर्भाव करावा.

स्वाक्षरीत/-
**कृषि संचालक (नि.व गुनि)**
**महाराष्ट्र राज्य, कृषि आयुक्तालय,पुणे**

---

जा.क्र.गुनि१/२/ताबिके/नियो.पत्र/१२९/१४
कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे-१
दिनांक: २८ /०७/२०१४

**प्रति,**

**विभागीय कृषि सहसंचालक (सर्व)**
**जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी (सर्व)**